23 AUG 2023

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कालानुसार ऊर्जा क्षेत्रात बदल करण्याची गरज

## प्रफुल्ल वानखेडे ; राष्ट्रीय फौंड्री दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठात कार्यक्रम

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

काळानुसार ऊर्जा क्षेत्रात नवीन बदल करणे आवश्यक असून, उद्योजकांनी ऊर्जा साक्षर होणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन केल्विन कंपनीचे चेअरमन उद्योगपती प्रफुल्ल वानखेडे यांनी केले. ७४ व्या राष्ट्रीय फौंड्री दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठ उद्योग कक्ष आणि इन्स्टिट्यूट ऑफ इंडियन फौंड्रीमन यांच्या वतीने आयोजित 'नवी औद्योगिक क्रांती आणि संधी' या विषयावर ते बोलत होते. प्रमुख पाहुणे म्हणून शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के उपस्थित होते.

वानखेडे म्हणाले, इंडस्ट्री ५.० मध्ये ऊर्जेचे महत्त्व वाढणार आहे. काळानुसार ऊर्जाक्षेत्रात बदल करण्याची गरज आहे. उद्योगातील प्रक्रिया निश्चितीसाठी संगणक प्रणालीचा प्रभावी वापर करावा. चर्चेपेक्षा कृतीवर अधिक भर द्यावा तसेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या धोरणानुसार संभाव्य धोक्यांचा अंदाज घेऊन पुढील रणनीती आखली पाहिजे. वाचन संस्कृती रुजवणे काळाची गरज आहे.

डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, उद्योग क्षेत्राला कुशल मनुष्यबळाची गरज असते. हे मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यासाठी विद्यापीठात विविध अभ्यासक्रम सुरू आहेत.

प्र. कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी उद्योजक एम. बी. शेख यांनी विद्यापीठात सुरू होणाऱ्या फौंड्री टेक्नॉलॉजी पदविका अभ्यासक्रमाची माहिती दिली. डॉ. एस. डी. डेळेकर यांनी स्वागत केले. महेश दाते यांनी प्रास्ताविक केले. राहुल पाटील यांनी आभार मानले.

यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे तसेच फौंड्री क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.



**कोल्हापूर : उद्योजक प्रफुल्ल वानखेडे यांचे स्वागत करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. शेजारी प्रमोद पाटील, व्ही. एन. शिंदे आदी.**

### कुशलता, प्रामाणिकपणाच्या जोरावर कोल्हापूरची औद्योगिक परंपरा वाढली

औद्योगिक क्रांतीमध्ये अनेक नव्या संधी उपलब्ध आहेत. त्या संधीचा लाभ घेण्यासाठी उद्योजकांनी एकमेकांमधील समन्वय वाढवण्याची गरज आहे. देशाला कोल्हापूरच्या उद्योगाने भरभरून दिले आहे. कुशलता आणि प्रामाणिकपणाच्या जोरावर कोल्हापूरची औद्योगिक परंपरा वाढली आहे. ही परंपरा पुढे नेण्यासाठी युवा उद्योजकांनी पुढाकार घेऊन नव्या बदलाचा स्वीकार केला पाहिजे. यासाठी संशोधनाला चालना देण्याची गरज आहे, असेही वानखेडे यांनी स्पष्ट केले.

सकाळ




**कोल्हापूर :** उद्योगपती प्रफुल्ल वानखेडे यांचा सत्कार कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी डावीकडून एस. डी. डेळेकर, महेश दाते, प्रमोद पाटील, मिलिंद बिरादार, विलास शिंदे उपस्थित होते.

# औद्योगिक संधी साधण्यासाठी ऊर्जा, अर्थसाक्षर बना

## प्रफुल्ल वानखेडे; शिवाजी विद्यापीठात व्याख्यान

कोल्हापूर, ता. २२ : 'पाचवी औद्योगिक क्रांती फौंड्रीसह विविध उद्योगांसाठी महत्त्वाची ठरणारी आहे. ते लक्षात घेता या औद्योगिक क्रांतीमधील नव्या संधी साधण्यासाठी उद्योजकांनी ऊर्जा आणि अर्थसाक्षर बनावे', असे आवाहन उद्योगपती व लेखक प्रफुल्ल वानखेडे यांनी आज येथे केले.

राष्ट्रीय फौंड्रीदिनानिमित्त शिवाजी विद्यापीठ उद्योग कक्ष आणि इन्स्टिट्यूट ऑफ इंडियन फौंड्री मेन (आयआयएफ) कोल्हापूर चॅप्टरतर्फे उद्योगपती वानखेडे यांचे विशेष व्याख्यान झाले. त्यांनी 'नवी औद्योगिक क्रांती आणि संधी'या विषयावर विचार मांडले. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहातील या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, तर प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे प्रमुख उपस्थित होते.

वानखेडे म्हणाले, 'नव्या औद्योगिक क्रांतीमध्ये ऊर्जेचे महत्त्व वाढणार आहे. त्यामुळे काळानुसार ऊर्जा क्षेत्रात नवीन बदल करणे गरजेचे आहे. कोल्हापूर ही बोलणाऱ्यांची नव्हे, तर काम करणाऱ्यांची भूमी आहे. कुशलता आणि प्रामाणिकपणाच्या जोरावर येथील औद्योगिक परंपरा वाढली आहे. ही परंपरा पुढे नेण्यासाठी बदलत्या काळानुसार वाटचाल करणे आवश्यक आहे. कुशलता, प्रामाणिकपणा ही खरी ओळख अधिक वाढविण्याच्यादृष्टीने येथील नव्या पिढी, संशोधकांनी काम करावे.'

उद्योजक एम. बी. शेख यांनी विद्यापीठात यावर्षीपासून सुरू होणाऱ्या फौंड्री टेक्नॉलॉजी पदविका अभ्यासक्रमाची माहिती दिली. विद्यापीठ उद्योग कक्षाचे समन्वयक डॉ. एस. डी. डेळेकर यांनी स्वागत केले. 'आयआयएफ' कोल्हापूरचे अध्यक्ष महेश दाते यांनी प्रास्ताविक केले. सचिव मिलिंद बिरादार यांनी प्रमुख पाहुण्यांची ओळख करून दिली. खजिनदार राहुल पाटील यांनी आभार मानले.

तरूण भारत



वारणानगर : कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडून सत्कार स्वीकारताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. एम. शेख.

# गुणवत्ता शिष्यवृत्तीत ग्रामीण गटातून वारणा महाविद्यालय प्रथम

**वारणानगर :** शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती मध्यें वाणिज्य व व्यवस्थापन या विद्याशाखेअंतर्गत ग्रामीण गटातून वारणा महाविद्यालयास प्रथम क्रमांक प्राप्त झाला आहे.

वारणानगर येथील यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालयातील वाणिज्य विभागाचा सन २०२२ – २३ या शैक्षणिक वर्षांमध्ये विद्यापीठामार्फत दिल्या जाणय्रा शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्तीमध्ये महाविद्यालयातील विविध विभागाचे विद्यार्थी दरवर्षी येत असतात, यावर्षी वाणिज्य विभागातील विद्यार्थी अधिक संख्येने गुणवत्ता यादीमध्ये आले आहेत त्यामध्ये वाणिज्य शाखेतील अंकिता पाटील,पूजा यादव, ऋतुजा गावडे, सुप्रिया खोत, प्रियंका पाटील, आकांक्षा पोतदार तसेच कला शाखेतील समीक्षा दळवी,पौर्णिमा मोरे या विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. विभाग शिक्षण मंडळाचे अध्यक्ष आ. डॉ. विनय कोरे, प्रशासकीय अधिकारी डॉ. वासंती रासम, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. एम. शेख, वाणिज्य विभागप्रमुख प्रा. रोहित बसनाईक, डॉ. चंद्रकांत जाधव, प्रबंधक बी. जे. लाडगावकर, शिष्यवृत्ती लिपिक अतिश देशमुख यांचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले.

तरूण भारत



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या भगवान महावीर अध्यासनाला निधीचा धनादेश व ग्रंथ सुपुर्द करताना सरोज चौगुले व आदी मान्यवर.

# भगवान महावीर अध्यासनाला सरोज चौगुले यांची १ लाखाची देणगी

कोल्हापूर : रत्नाप्पा कुंभार नगर येथील सरोज चौगुले यांनी आई–वडीलांच्या स्मरणार्थ भगवान महावीर अध्यासनाला दुर्मिळ व प्राचीन १६ ग्रंथ दिले. तसेच अध्यासनाच्या इमारतीसाठी एक लाख रुपयांचा निधी देणगी स्वरूपात दिला आहे. स्व. प्रा. डॉ. सुभाषचंद्र मादनाईक व स्व. तात्यासाहेब पाटील यांच्या स्मरणार्थ १२० पुस्तके दिली. शिवाजी विद्यापीठातील भगवान महावीर अध्यासनाच्या प्रस्तावित इमारतीसाठी एक लाख रुपयांचा धनादेश कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडे दिला. भगवान महावीर अध्यासनाच्या पदविका व प्रमाणपत्र परीक्षेतील गुणवंतांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. विजय ककडे यांनी आभार मानले. यावेळी प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव व्ही. एन. शिंदे व वित्त व लेखा अधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, प्रा. आर. बी. पाटील, प्रा. डॉ. बी. डी. खणे आदी उपस्थित होते.

पुढारी

# 'उद्योजकता विकासात कौशल्य समन्वयकाची भूमिका महत्त्वाची'

कोल्हापूर : वेगाने बदलणाऱ्या जगात कौशल्य व उद्योजकता यामुळे विद्यार्थ्यांचा विकास होईल. त्यासाठी महाविद्यालयाची व कौशल्य समन्वयकाची भूमिका महत्त्वाची ठरेल, असे प्रतिपादन प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी केले. शिवाजी विद्यापीठात कौशल्य व उद्योजकता विकास विभागाच्या वतीने महाविद्यालयातील समन्वयकासाठी एक दिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिद्ध बिझनेस कोच रवींद्र खैरे, शिखर बँकेचे गणेश गोडसे उपस्थित होते. उद्योजकता विकास, कौशल्य विकास, नवोपक्रम, स्टार्टअप, बँकेच्या विविध योजना, उद्योगासाठी शासनाच्या योजनांची विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. प्रा. पी. डी. राऊत, रवींद्र खैरे, गणेश गोडसे, राहुल गोरे यांनी मार्गदर्शन केले. विभागाचे संचालक प्रा. डॉ. आर. जी. पवार यांनी सूत्रसंचालन केले. कौशल्य विकास अधिकारी प्रमोद कांबळे यांनी आभार मानले.




कोल्हापूर : कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी बोलताना प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील.

तरुण भारत

# कौशल्यासह उद्योजक विकासात समन्वय महत्वाचा

- प्र-कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील यांचे मत

प्रतिनिधी
कोल्हापूर

वेगाने बदलणाऱ्या जगात कौशल्य व उद्योजकतेमुळे विद्यार्थ्यांचा विकास होईल. त्यासाठी महाविद्यालयाची व कौशल्य समन्वयकाची भूमिका महत्त्वाची ठरेल, असे मत प्र-कुलगुरू मा. डॉ. पी. एस. पाटील यांनी विद्यापीठाच्या एकदिवशीय कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी व्यक्त केले.




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील कार्यक्रमात मार्गदर्शन करताना प्र-कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील. सोबत बिझनेस कोच रवींद्र खैर, गणेश गोडसे, डॉ. आर. जी. पवार.

विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहात पार पडलेल्या या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिद्ध बिझनेस कोच रवींद्र खैरे, शिखर बँकेचे गणेश गोडसे व विभागाचे संचालक डॉ. आर. जी. पवार उपस्थित होते. विद्यापीठाच्या कौशल्य व उद्योजकता विकास विभागाच्यावतीने महाविद्यालयातील समन्वयकासाठी एकदिवशीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये उद्योजकता विकास, कौशल्य विकास, नवोपक्रम, स्टार्ट अप, बँकेच्या विविध योजना, उद्योगासाठी शासनाच्या योजनांची माहिती मान्यवरांनी दिली. डॉ. पी. डी. राऊत, रवींद्र खैरे, गणेश गोडसे, राहुल गोरे, इंडस्ट्री इन्स्पेक्टर या मान्यवरांनी मार्गदर्शन केले. दिवसभर विविध विषयांवर मंथन करण्यात आले. स्वागत विभागाचे संचालक डॉ. आर. जी. पवार यांनी केले. आभार कौशल्य विकास अधिकारी प्रमोद कांबळे यांनी मानले. यावेळी सांगली, सातारा, कोल्हापूर जिल्ह्यातील महाविद्यालयातील कौशल्य समन्वयक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लोकमत

# कौशल्य समन्वयकाची भूमिका महत्त्वाची

## पी. एस. पाटील यांचे मत : शिवाजी विद्यापीठात कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** वेगाने बदलणाऱ्या जगात कौशल्य व उद्योजकता यामुळे विद्यार्थ्यांचा विकास होईल. त्यासाठी महाविद्यालयाची व कौशल्य समन्वयकाची भूमिका महत्त्वाची ठरेल, असे मत शिवाजी विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी व्यक्त केले.

मंगळवारी विद्यापीठाच्या एकदिवसीय कार्यशाळेचे उद्घाटन याप्रसंगी ते बोलत होते. विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहात विद्यापीठाच्या कौशल्य व उद्योजकता विकास विभागाच्या वतीने ही कार्यशाळा झाली.

यावेळी प्रसिद्ध बिझनेस कोच रवींद्र खैरे, शिखर बँकेचे गणेश गोडसे व विभागाचे संचालक प्रा. डॉ. आर. जी. पवार उपस्थित होते. यामध्ये उद्योजकता विकास, कौशल्य विकास, नवोपक्रम, स्टार्ट अप, बँकेच्या विविध योजना, उद्योगासाठी शासनाच्या योजना या विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले आहे. दिवसभर विविध विषयांवर मंथन करण्यात आले.

विभागाचे संचालक प्रा. डॉ. आर. जी. पवार यांनी स्वागत केले. कौशल्य विकास अधिकारी प्रमोद कांबळे यांनी सूत्रसंचालन केले.

लोकमत

# जपानी भाषेच्या आंतरराष्ट्रीय परीक्षेत १४ विद्यार्थ्यांचे यश

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभागाच्या १४ विद्यार्थ्यांनी 'जपानी भाषा प्रावीण्य चाचणी परीक्षा' (जे.एल.पी.टी.) या आंतरराष्ट्रीय स्तरावरील परीक्षेत 'अ' श्रेणीमध्ये विशेष प्रावीण्य मिळविले.

जपान फाउंडेशन व जपान एज्युकेशनल एक्स्चेंजेस अँड सर्व्हिसेस या संस्थेतर्फे जगभरात एकाच दिवशी एकूण '५ लेवल'मध्ये जपानी भाषा प्रावीण्य चाचणी परीक्षा घेतल्या जातात. या परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर मिळणारे प्रमाणपत्र हे जपानी कंपनीमध्ये नोकरीच्या संधीसाठी उपयुक्त ठरते. यापूर्वी विभागातील पूर्वा नाडगोडा व प्रमोद कदम यांनी या परीक्षा उत्तीर्ण होऊन जपानमध्ये नोकरीची संधी मिळवली आहे व ते सध्या जपानमध्ये कार्यरत आहेत.

या आंतरराष्ट्रीय स्तरावरील लेवल 'एन-५'मध्ये समीप जोतकर, देविका राणे, तन्वी डांगे, प्रीती मोगाने, अनुराग सामंत, समृद्धी मंडलिक, अमृता राणे, कीर्ती गायकवाड, प्राजक्ता आगलावे, देवराज पवार, आकांक्षा पाटील, सृष्टी तांदळे, अनिकेत निर्मले यांनी विशेष प्रावीण्य मिळवले आहे. तसेच 'एन-४' या लेवलमध्ये कु. कृतिका वायकोळे हिने यश मिळविले. जपानी भाषा शिक्षिका स्नेहल शेट्ये यांनी या सर्व विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शन केले. डॉ. मेघा पानसरे यांनी विभागातील विद्यार्थ्यांच्या यशामुळे विदेशी भाषा विभागप्रमुख म्हणून अभिमान वाटत असल्याचे सांगितले.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठात 'सुरुवात उद्योजकतेची' कार्यक्रमाचे उद्‌घाटन

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठ पर्यावरणशास्त्र विभागातर्फे विद्यार्थ्यांमध्ये उद्यमशीलतेला चालना मिळावी, उद्योजक तयार व्हावेत, यासाठी 'सुरुवात उद्योजकतेची' कार्यक्रमाचे उद्‌घाटन झाले.

रिसर्च अँड डेव्हलपमेंट फाऊंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी व पर्यावरणशास्त्र विभागाचे माजी विभागप्रमुख प्रा. डॉ. प्रकाश राऊत प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. सेंटर ऑफ इनोव्हेशन अँड लिंकेजसचे संचालक डॉ. एम. एस. देशमुख कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. कार्यक्रमास प्रा. डॉ. पल्लवी भोसले, प्रा. निखिल राऊत उपस्थित होते. पूजा धर्मोजी यांनी सूत्रसंचालन केले.

पुढारी

# जपानी भाषेच्या आंतरराष्ट्रीय परीक्षेत विद्यापीठातील १४ विद्यार्थ्यांचे यश

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभागाच्या १४ विद्यार्थ्यांनी जपानी भाषा प्रावीण्य चाचणी परीक्षा (जेएलपीटी) या आंतरराष्ट्रीय स्तरावरील परीक्षेत 'अ' श्रेणीमध्ये विशेष प्रावीण्य मिळवले आहे. जपान फाऊंडेशन व जपान एज्युकेशनल एक्सचेंजेस अँड सर्व्हिसेस या संस्थांच्या संयुक्त विद्यमाने जगभरात एकाच दिवशी ५ लेव्हलमध्ये परीक्षा घेतल्या जातात. स्नेहल शेटये यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले. डॉ. मेघा पानसरे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

तरुण भारत

# जपानी भाषा परीक्षेत १४ विद्यार्थ्यांचे यश

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभागाच्या १४ विद्यार्थ्यांनी 'जपानी भाषा प्राविण्य चाचणी परीक्षा' (जे.एल.पी.टी.) या आंतरराष्ट्रीय स्तरावरील परीक्षेत 'अ' श्रेणीमध्ये विशेष प्राविण्य मिळवले आहे. विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

जपान फाऊंडेशन व जपान एज्युकेशनल एक्सचेंजेस ॲंड सर्व्हिसेस या संस्थांच्या संयुक्त विद्यमाने जगभरात एकाच दिवशी एकूण '५ लेवल' मध्ये जपानी भाषा प्राविण्य चाचणी परीक्षा घेतल्या जातात. या परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर मिळणारे प्रमाणपत्र हे जपानी कंपनीमध्ये नोकरीच्या संधीसाठी खूप उपयुक्त ठरते.

यापूर्वी विभागातील पूर्वा नाडगोंडा व प्रमोद कदम यांनी या परीक्षा उत्तीर्ण होऊन जपानमध्ये नोकरीची संधी मिळवली आहे व ते सध्या जपानमध्ये कार्यरत आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावरील लेवल 'एन-५' मध्ये समीप जोतकर, देविका राणे, तन्वी डांगे, प्रीती मोगाने, अनुराग



सामंत, समृद्धी मंडलिक, अमृता राणे, कीर्ती गायकवाड, प्राजक्ता आगलावे, देवराज पवार, आकांक्षा पाटील, सृष्टी तांदळे, अनिकेत निर्मले यांनी विशेष प्राविण्य मिळवले आहे. तसेच 'एन-४' या लेवल मध्ये ऋतिका वायकोळे हिने यश मिळवले आहे. जपानी भाषा शिक्षिका श्रीमती स्नेहल शेट्ये यांनी विशेष मार्गदर्शन केले. डॉ. मेघा पानसरे यांनी विदेशी भाषा विभागप्रमुख म्हणून अभिमान वाटत असल्याचे मत व्यक्त केले.